सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# महसूल व वन, मदत व पुनर्वसन विभाग

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली.

२०२३-२४

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | विषय सूची | पान क्र. |
|---|---|---|
| | **हिंगोली जिल्हा थोडक्यात माहिती** | 8-12 |
| **१)** | **प्रस्तावना** | 13 - 15 |
| १.१. | अनेकविध आपत्ती प्रतिसाद योजना | |
| १.२. | उद्देश | |
| १.३. | धोरणात्मक निर्णय | |
| १.४. | संवाद व माध्यम | |
| १.५. | पर्यवेक्षण निदान व सुचना देणारी पध्दती. | |
| **२)** | **विविध विभागातंर्गत करावयाची तयारी** | 16 - 24 |
| २.१. | पोलीस | |
| २.२. | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ | |
| २.३. | आरोग्य विभाग. | |
| २.४. | महाराष्ट्र जिवन प्राधिकरण | |
| २.५. | पाटबंधारे विभाग | |
| २.६. | दुरसंचार विभाग | |
| २.७. | सार्वजनिक बांधकाम विभाग. | |
| २.८. | कृषि विभाग | |
| २.९. | पशु संवर्धन विभाग | |
| **३)** | **जिल्हास्तरीय संस्थात्मक संरचना** | 25 - 52 |
| ३.१. | जिल्हाधिकाऱ्यांनी जबाबदारी | |
| ३.२. | आपत्ती व्यवस्थापन समिती | |
| ३.३. | जिल्हा नियंत्रण कक्ष | |
| ३.३.१ | नेहमीचा कृती कार्यक्रम | |
| ३.३.२ | आपत्ती किंवा आपत्तीची पुर्व सुचना | |
| ३.३.३ | जिल्हा नियंत्रण कक्षाची रचना | |
| ३.३.४ | कृती कक्ष | |
| ३.३.५ | सेवा कक्ष | |
| ३.३.६ | पायाभुत कक्ष | |
| ३.३.७ | आरोग्य कक्ष | |
| ३.३.८ | तर्कशास्त्र कक्ष | |
| ३.३.९ | कृषि कक्ष | |

| | | |
|---|---|---|
| ३.३.१० | संवाद आणि माहिती कक्ष | |
| ३.३.११ | सुविधा कक्ष | |
| ३.३.१२ | विभागीय आयुक्तांची भुमिका (कार्य) | |
| ३.४ | स्थळ कृती केंद्र व मदत शिबीर | |
| ३.५ | जिल्हा नियंत्रण कक्षात असलेल्या सुविधा | |
| ३.६ | बहु जिल्हा आपत्ती | |
| **४)** | **जबाबदाराची रचना** | 53 - 78 |
| ४.१ | नियोजन गृहितके | |
| ४.२ | जिल्ह्यातील महत्वाच्या अधिकाऱ्यांचे दुरध्वनी क्रमांक | |
| ४.३ | विविध सामाजिक संस्थाकडुन मिळणारी मदत | |
| ४.४ | विविध विभागांना उपलब्ध असलेला खासगी क्षेत्राचा सहभाग | |
| ४.५ | भुकंप | |
| ४.५.१ | अग्रगण्य संस्था | |
| ४.५.२ | नुकसानीचे स्वरुप | |
| ४.५.३ | संभाव्य परिणाम | |
| ४.६ | पुर | |
| ४.६.१ | नियोजन गृहितके | |
| ४.६.२ | अग्रगण्य संस्था | |
| ४.६.३ | संभाव्य परिणाम | |
| ४.७ | साथीचे रोग | |
| ४.७.१ | नियोजनाची गृहितके | |
| ४.८ | रस्ते अपघात | |
| ४.८.१ | नियोजनाची गृहितके | |
| ४.८.२ | अग्रगण्य संस्था | |
| ४.९ | आग | |
| ४.९.१ | संभाव्य परिणाम | |
| ४.१० | औद्योगीक आणि रासायनिक अपघात | |
| ४.१०.१ | नियोजनाची गृहितके | |
| ४.१०.२ | अग्रगण्य संस्था संभाव्य परिणाम | |
| ४.११ | मोठे वादळ (तुफान) | |
| ४.११.१ | नियोजनाची गृहितके | |
| ४.११.२ | अग्रगण्य संस्था | |
| ४.११.३ | संभाव्य परिणाम | |
| **५)** | **अशासकीय संघटना आणि स्वयंसेवी संस्था** | |

| | | |
|---|---|---|
| ५.१ | अशासकीय संघटनांची यादी व त्यांच्याकडुन मिळणारी मदत | 79 - 94 |
| ५.२ | आपत्ती व्यवस्थापन कार्यामध्ये सहभागी अशासकीय संघटना | |
| ५.३ | उत्तेजनार्थ घटकांची पूर्वतयारी | |
| ५.३.१ | परस्पर सहकार्य व प्रतिसाद गट | |
| ५.३.२ | समाज घटक तात्काळ प्रतिसाद संघ | |
| ५.४ | समाज सहभागाची क्षेत्रे | |
| ५.४.१ | स्थलांतर समयीचा लोकसहभाग | |
| ५.४.२ | आपत्ती समयी लोकनेत्यांचे कार्य | |
| ५.४.३ | मदत व पुनर्वसन कार्य | |
| ५.५ | कुंटुंब स्तरावरील पुर्वतयारी | |
| ५.६.१ | आग | |
| ५.६.२ | भुकंप | |
| ५.६.३ | पुर | |
| **६)** | **उपलब्ध सोयी सुविधा, संस्था -संपर्क पत्ते, दुरध्वनी क्र. यादी** | 95 - 106 |
| ६.१ | खाजगी डॉक्टरांची यादी | |
| ६.२ | खते व किटक नाशके यांचे घाऊक विक्रेते | |
| ६.३ | खाजगी बस मालक | |
| ६.४ | पुश वैद्य, दवाखाने व संबंधीत औषध विक्रेते | |
| ६.५ | साखर कारखाने | |
| ६.६ | बेकरीज | |
| ६.८ | वास्तुशास्त्रज्ञ | |
| ६.९ | औषध विक्रेते | |
| ६.१० | बांबु विक्रेते | |
| ६.११ | विंधन विहीर सेवा | |
| ६.१२ | सिमेंट पाईप निर्माते | |
| ६.१३ | लाईन आऊटलेट निर्माते | |
| ६.१४ | सिमेंट विक्रेते | |
| ६.१५ | बांधकाम व्यवसाईक व कंत्राटदार | |
| ६.१६ | महाविद्यालये | |
| ६.१७ | इलेक्ट्रीक मोटार विक्रेते | |
| ६.१८ | लोखंड विक्रेते | |
| ६.१९ | गॅस विक्रेते | |
| ६.२० | रॉकेल विक्रेते | |
| ६.२१ | पशु खाद्य विक्रेते | |

| | | |
|---|---|---|
| ६.२२ | आचारी | |
| ६.२३ | तंबु / मंडप वाले | |
| ६.२४ | मंगल कार्यालये | |
| ६.२५ | वाहतुक ठेकेदार | |
| ६.२६ | लॉजेस | |
| ६.२७ | वर्तमानपत्र वार्ताहर | |
| ६.२८ | दुध पुरवठा केंद्रे | |
| ६.२९ | दालमील | |
| ६.३० | हिंगोली जिल्ह्यातील मुख्य व्यापारी. | |
| ६.३१ | हिंगोली जिल्ह्यातील (जे.सि.बी., क्रेन, पोकलेन मालक) | |
| ६.३२ | हिंगोली जिल्ह्यातील (पेट्रोल पंप) | |
| ६.३० | संदेश नोंदवहीचा नमुना | |
| | | |
| ७ | ७.१-पुर आपत्तीत करावयाचा उपाययोजना | 107 - 117 |
| | | |
| | ७.३-शोध व बचाव पथक व शोध व बचाव साहित्य | |

# प्रस्तावना

नैसर्गिक आपत्तीच्या पूर्वकाळात विविध विभागांचे आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करुणे व ते सातत्याने अद्ययावत ठेवणे यामूळे आपत्ती काळात उपाययोजना प्रभावीपणे राबविता येतात. नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी विविध विभागांचा एकमेकांशी संपर्क आणि समन्वय तसेच पूर्वतयारी असणे अत्यंत आवश्यक बाब आहे. आपत्तीच्या पूर्व तयारीमूळे कोणत्याही आपत्तीला आत्मविश्वासाने आणि सक्षमपणे सामोरे जाण्याची प्रशासकीय अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची तसेच नागरीकांचीही मानसिक तयारी होते. त्यामूळे आपत्तीकाळात मानसिक ताण येणे, गोंधळ उडणे व सुरक्षेसाठी आवश्यक निर्णय तातडीने घेता न येणे अशी दुरावस्था टाळता येते. या बाबी लक्षात घेऊनच हिंगोली जिल्हा प्रशासनाने सर्व खात्यांचा समन्वय साधणारा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार केला आहे.

या आराखड्यामुळे सर्व विभागांना आपत्तीपुर्व काळ, आपत्तीमध्ये व आपत्तीनंतर या तिन्ही स्तरावर प्रत्येकाच्या कामाची जबाबदारी समजून घेता येईल व ऐन आपत्तीच्या काळात कोणावर नेमकी काय जबाबदारी आहे हे प्रत्येकाला समजल्याने नैसर्गीक आपत्तीचा सक्षमपणे मुकाबला करता येईल. या पुस्तिकेत याबरोबरच नैसर्गिक आपत्ती काळात जबाबदार अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक दिले आहेत, त्याचाही मोठया प्रमाणात उपयोग होईल.

नैसगिर्क आपत्तीपूर्वी, आपत्तीमध्ये व आपत्तीनंतर सर्वांना या पुस्तिकेचा उपयोग होईल अशी अपेक्षा आहे.

**जितेंद्र पापळकर (भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, हिंगोली.**
तथा **अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**

# दोन शब्द

निसर्गाच्या उत्पत्ती पासूनच निसर्गात अनेक प्रकारचे बदल घडत आले आहेत आणि नेहमी घडत असतात. त्यात काही उपयुक्त तर काही विनाशक देखील घडत असतात. मानवी जीवनाने आजतागायत अगणित वेळा निसर्गाची विध्वंसकता महापुर, भुकंप, वादळ अशा माध्यमातून अनुभवलेली आहे. जीवनात असे अनेक संकटे येत असतात व प्रत्येक संकटातून नवीन काही तरी शिकायला मिळते व जुन्या अनुभवाच्या बळावर येणाऱ्या नवीन संकटाची चाहूल घेता येते. विचार पूर्वक नियोजन करून कृतीशील आराखडा आखता येतो व संकटावर मात करता येते. त्यासाठी आवश्यक असते ती नियोजनाची.

हिंगोली जिल्ह्यात कधीही नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती निर्माण झाल्यास जिल्ह्यातील विवीध विभागातील अधिकारी व नागरीक त्याला जिल्ह्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्याच्या मदतीने धैर्याने सामोरे जातील असा विश्वास वाटतो. सदर आराखडा आपत्कालीन परिस्थितीत विवीध विभागांना जोडणारी दुवा ठरणार आहे. आपत्ती व्यवस्थापन कामी या आराखड्याचा पुरेपूर उपयोग होईल अशी मला खात्री वाटते.

**दिलीप कच्छवे**
**निवासी उपजिल्हाधिकारी**
**तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**

# हिंगोली जिल्हा थोडक्यात माहिती

## १) भौगोलिक माहिती

- उत्तर अक्षांश: १९-१४''  ते २०-१''
- पूर्व रेखांश: ७६-१६'' ते ७७-१५''
- समुद्र सपाटीपासून उंची: ४५० ते ५५० मी.
- सरासरी पर्जन्यमान: ८९० मी.मी.
- क्षेत्रफळ: ४,५२,६०० हेक्टर
- शेती लायक क्षेत्र- ३,७९,४६८ हेक्टर
- लोकसंख्या: ११,७७,३४५ (२०११ जनगणनेनुसार)

## २) हिंगोली जिल्हा प्राकृतिक

- हिंगोली जिल्हा बालाघाटाच्या पठारावर असून बहुतांश भाग पठारी आहे. जिल्ह्यातून पूर्व पश्चीम बालाघाटाच्या रांगा असून नैऋत्य दिशेस अजिंठा घाटाची सीमा आहे.
- पर्जन्यमान: ८९० मिमी आहे. वसमत कळमनुरी तालुक्याचा भाग माफक पर्जन्यमान तर उर्वरित भाग खात्रीलायक पर्जन्यमान असलेला आहे.

## ३) रेल्वेमार्ग

हैद्राबादमनमाड- हा ब्रॉडगेज मार्ग तसेच पुर्णा - अकोलाअजमेर- हा पुर्वीचा मिटरगेज मार्ग जिल्ह्यातून जातो.  पूर्णा - अजमेर या मिटरगेज मार्गाचे पुर्णा ते कनेरगाव (जिल्हा सीमा( या लांबीचे ब्रॉड गेजमध्ये रुपांतर नुकतेच पूर्ण झाले आहे.  पुर्णा- हिंगोली हि रेल्वे लाईन १९१२ मध्ये निजाम सरकारने बांधून पुर्ण केली होती.  तर हिंगोली - कनेरगाव हा लोहमार्ग स्वातंत्र्यानंतर म्हणजेच १९५७ मध्ये पुर्ण झाला.

## ४) रस्ते

अकोला - हैद्राबाद हा वर्दळीचा राज्य मार्ग हिंगोली येथून जातो.  सन १८७० मध्ये अकोला हिंगोली हा मार्ग इंग्रजांनी बांधून पुर्ण केला होता.

- राष्ट्रीय महामार्ग - लांबी ३०.४० कि.मी.
- राज्य महामार्ग - लांबी ४५८.०५ कि.मी.
- प्रमुख जिल्हा मार्ग - लांबी ७८०.०० कि.मी.
- इतर जिल्हा मार्ग - लांबी ४८८.०० कि.मी.
- ग्रामिण मार्ग - लांबी २०१८.०० कि.मी.

## ५) तालुके

१) हिंगोली   २) कळमनुरी   ३) सेनगाव   ४) वसमत   ५) औंढा (नागनाथ)

६) <u>प्राकृतिक</u>

हिंगोली जिल्हा हा बालाघाट पठारावर आहे यालाच दख्खनचे पठार असेही संबोधीले जाते. जिल्ह्यातील बहुतांशी भाग सपाट पठारी असून नद्यांच्या खोऱ्यात असल्यामूळे सुपीक आहे. जिल्ह्यातून पुर्वपश्चिम- अशा बालाघाटाच्या रांगा आहेत तर नैऋत्य दिशेस अजिंठा घाटाची सिमा आहे.

७) <u>हवामान</u>

सर्वसाधारण उष्ण कोरडे असून तापमान ३० अंश सेटीग्रेड एवढे आहे.

८) <u>पर्जन्यमान</u>

जिल्ह्यात सरासरी पर्जन्यमान ८९० मी.मी. आहे. वसमत व कळमनुरी तालुक्याचा भाग माफक पर्जन्यमान तर उर्वरीत जिल्हयाचा भाग हा खात्रीलायक पर्जन्यमान असलेला आहे .

१. दिनांक ०१ जून २०१४ ते १० ऑक्टोबर २०१४ पर्यंतचा पाऊस -२२९८ मि.मी.
२. दिनांक ०१ जून २०१४ ते १० ऑक्टोबर २०१४ पर्यंतचा वार्षिक सरासरी पाउस - ४५९.६४ मि.मी.
३. दिनांक ०१ जून २०१४ ते १० ऑक्टोबर २०१४ पर्यंतची वार्षिक पावसाशी टक्केवारी ५२.२२ %

९) <u>प्रमुख पिके</u>

**खरीप पिके -** ज्वारी, मुग, उडीद, तुर, कापुस, सोयाबीन (कापसाच्या प्रचंड उत्पादनामूळे जिल्हयास कापसाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते(.

**रब्बी पिक -** ज्वारी, गहू, हरभरा, करडई, भूईमुंग

जिल्ह्यातील कळमनुरी व वसमत तालुक्यात केळी व उसाचे पिक फार मोठया प्रमाणावर घेतले जाते. तसेच सेनगाव तालुक्यात विडयाच्या पानांचे मळे आहेत त्यामुळे तालुक्यातील एका गावाचे नाव हे "पानकनेरगाव" असे ठेवण्यात आले आहे.

१०) <u>प्रमुख फळे</u>

फलोत्पादन क्रांतीमूळे आंबा, पेरू, संत्री, मोसंबी फळांचे क्षेत्र प्रंचड वाढले आहे. जिल्ह्यातील आंबा परदेशात निर्यात होतो.

११) <u>प्रमुख नद्या व नद्यावरील गावे आणि धरणे</u>

| जिल्ह्यातील नद्या | जिल्ह्यातील तालुकानिहाय पूराची शक्यता असणारी गावे | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | हिंगोली | कळमनुरी | औंढा ना . | सेनगाव | वसमत | |
| कयाधू नदी | १हिंगोली (<br>२हींगनी (<br>३समगा (<br>(४दुर्गधामनी<br>५धानापुर (<br>६सागद (<br>७ (पातोंडा | १शेवाळा (<br>२चिखली (<br>३( कोंढुर<br>४येलकी (<br>५बिबथर (<br>६ नांदापुर (<br>७ डोंगरगाव (<br>पुल<br>८धारधावंडा (<br>९ कसबे (<br>धावंडा<br>१०कान्हेगांव (<br>११फुटाणा (<br>१२( येगाव<br>१३ टाकळग(<br>व्हाण– | | १सेनगाव (<br>२ कोळसा (<br>३ गुगुळ (<br>पिंपरी<br>४कोंडवाडा ( | | २४ गावे |
| पैनगंगा नदी | १भातसावंगी (<br>(२दुर्गसांगवी<br>३ सावरगाव (<br>बंगला<br>४हिरडी (<br>५मोप (<br>६ कन्हेरगाव (<br>नाका<br>७.वांझोळा (<br>८खेड (<br>९ महादेव (<br>वाडी<br>१०पारडा ( | | | १ भगवती (<br>२तपोवन (<br>३सूरजखेडा (<br>(४सवना<br>५ मानस (<br>पिंपरी<br>६ पार्डी (<br>पोहकर<br>७ वायचळ (<br>पिंपरी<br>८तपोवन (<br>९गारखेडा ( | | १९ गावे |

| जिल्ह्यातील नद्या | जिल्ह्यातील तालुकानिहाय पूराची शक्यता असणारी गावे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हिंगोली | कळमनुरी | औंढा ना . | सेनगाव | वसमत | |
| **पूर्णा नदी** | | | १ .पोटा बु (<br>२.पोटा खु (<br>३ अनखळी (<br>४ माथा (<br>५ टाकळग(<br>व्हाण–<br>६ पेरजाबाद(<br>७( नालेगांव<br>८ तपोवन (<br>९( रुपूर. | १ धानोरा (<br>बंजारा<br>२.बझर खु ( | १ सोन्ना तर्फे (<br>हट्टा<br>२) ब्राम्हणगाव बु .<br>३) ब्राम्हणगाव खु .<br>४) सांवगी बु .<br>५) ढऊळगांव<br>६) माटेगांव<br>७) पिंपळगाव कुटे<br>८) परळी | **१९ गावे** |
| **नाला** | | १डीग्रस ( | | १.केंद्रा बू ( | १) आरळ<br>२) वसमत<br>३कुरुंदा (<br>४) खांडेगाव<br>५( धामणगाव<br>६( आसेगांव<br>७) कानोसा<br>८.जवळा बु ( | **१० गावे** |
| **एकुण गावे** | **१७ गावे** | **१४ गावे** | **०९ गावे** | **१६ गावे** | **१६ गावे** | **जिल्ह्यातील पूराची शक्यता असणारी ७२ गावांची एकुण लोकसंख्या २,८१,१३९** |
| **एकुण लोकसंख्या** | **१,०४,१८६** | **२२,५६९** | **१४,१८५** | **३७,३३३** | **१,०२,८६६** | |

**प्रमुख नद्या व धरणे:**

- **पैनगंगा नदी:**
  सदर नदी हि सेनगाव, हिंगोली,कळमनुरी या तालुक्यातून वाहते. याच नदीवर **इसापूर** येथे ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प (इसापूर धरण) बांधले आहे.
- **पूर्णा नदी**:
  सदर नदी हि सेनगाव, औढा या तालुक्यातून वाहते. पूर्णा नदीवर **येलदरी** येथे धरण बांधले असून पुढे याच नदीवर **सिद्धेश्वर येथे धरण** बाधले आहे.
- **कयाधू नदी:**
  सदर नदी हि सेनगाव, हिंगोली, कळमनुरी या तालुक्याच्या मध्यवर्ती भागातून वाहते.

१२) पूर परिस्थती )Risk Scenario: Hingoli)

- आपत्ती इतिहास (पूर) : २००६ साली जिल्ह्यामध्ये पूर आलेला होता व बचाव कार्यासाठी लष्करास पाचारण करावे लागले होते.
- बुलढाणा जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यास पैनगंगा नदीला पूर येतोव पुराची प्रत्यक्ष झळ सेनगाव तालुक्यातील भगवती गावाला बसते तर नदीला आलेल्या फुगवटयामुळे नदीला मिळणारे नाले तुंबल्यामुळे काही गावांचा संपर्क तुटतो.
- जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्यास कयाधू नदीला पूर येतो व नदीकाठच्या गावांना धोका पोहोचतो.
- सिद्धेश्वर धरणातून ७५००० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग झाल्यास औढा तालुक्यातील रुपूर गावास पूर येण्याचा धोका आहे. तसेच १ ते २ लाख क्युसेक्स पाण्याचा विसर्ग झाल्यास औंढा तालुक्यातील ८ गावांना धोका उदभवतो.
- इसापूर धरणातून ७०,००० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग झाल्यास कळमनुरी तालुक्यातील वाकोडी या एकमेव गावास पुराचा धोका उदभवतो.
- (पूर येणार या बाबतची माहिती सर्वसाधारणपणे ३६ ते ४८ तास अगोदर कळते. त्यामुळे संबंधितांना हलविण्यास पुरेसा वेळ मिळतो)
- दि.०५.०८.२००६ ते दि.०७.०८.२००६ आलेल्या पुरामुळे जिल्ह्यातील १२ गावांना पाण्याने वेडा घातला होता व इतर गावांमध्ये पाणी शिरले होते तेथील नागरीकांना प्रशासनाच्या मदतीने सुरक्षित स्थळी हलविण्यात आले होते. सन २००६ वेळी आलेल्या पुराची शक्यता नाकारता येऊ शकत नाही, त्यामुळे प्रकरण ७ मध्ये अशी परीस्थिती परत ओढवल्यास काय करावे याबाबत माहिती व उपाययोजना.

# प्रकरण – १

## प्रस्तावना

राज्याच्या सर्वकष तयारीचा एक भाग म्हणुन तसेच जिल्हा प्रशासनाची कार्यक्षमता वाढावी म्हणुन महाराष्ट्र शासनाने राज्य आपत्कालीन कृति योजना तयार केली आहे. यासंदर्भात प्रत्येक जिल्हा प्रशासनाने आपली स्वत:ची जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कृती योजना तयार केली आहे. ही बहुउद्देशीय प्रतिसाद योजना जिल्हा प्रशासनाची कार्यक्षमता निश्चीतच वाढविल अशी अपेक्षा आहे.

### १.१ अनेक विध आपत्ती प्रतिसाद योजना

भुकंप, पुर, वादळ, साथीचे रोग, औद्योगिक अपघात, रस्ते अपघात आणि आगीचा समावेश जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कृति योजनेत केलेला आहे. पुर आणि भुकंप या सारख्या काही आपत्ती मोठ्या भु-भागावर होत असतात. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर जिवीत, वित्त आणि पर्यावरण हानी होते. साथीच्या रोगांसारख्या काही आपत्ती मोठ्या प्रमाणावर फक्त जिवित हानी करतात. यापैकी कोणत्याही आपत्तीवर नियंत्रण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सुविधांची व मनुष्यबळाची आवश्यकता असते.

### १.२ उद्देश

१) जिल्ह्यातील संभाव्य धोक्याची माहिति घेऊन व मुल्यमापन करुन जिल्हा स्तरावरील पुर्वतयारीत सुधारणा करणए व या द्वारे आपत्ती कालावधीत मनुष्य व वित्त हानी टाळणे.

२) आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात सहभागी संस्थाकडून उपलब्ध सोई- सुविधांची माहिति मिळविणे व त्याचा आपत्ती व्यवस्थापनात जिल्हा प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यास उपयोग करुन घेणे. ही माहिती ज्लिहा प्रशासनास आपत्तीला कार्यक्षमतेने तोंड देण्यास तसेच समाजाच्या विविध स्तरामध्ये विश्वास निर्माण करण्यास सहाय्यभुत ठरेल.

३) आपत्कालीन कृति आराखड्याद्वारे तयार केलेल्या विविध माहितीची उपयोग जिल्हातील विविध विकासात्मक योजनांसाठी करुन घेणे.

४) भौगोलिक माहिति पध्दती (GIS) संवेदुर पध्दती (Remote Sensing) इत्यादीतील शास्त्रीय व तांत्रीक माहितीचा उपयोग ही योजना तयार करण्यासाठी व दिर्घकालीन विकासात्मक योजनांसाठी करुन घेणे.

५)जिल्हामध्ये आपत्ती निवारणाबाबतची माहिती व्यवस्थित साठवुन ठेवणे, माहितीचे अद्यावतीकरण करणे, प्रतिसादांचे व्यवस्थित मुल्यमापन करुन नविन सुधारणा सुचवणे व या विषयीचे जाळे तयार करणे.

६) जिल्हा आपत्कालीन कृती योजनेचा उपयोग महाराष्ट्र शासनाच्या विविध धोरणांसाठी करुन घेणे म्हणूनच आपत्ती निवारणासाठी औपचारिक कृति योजनेची आवश्यकता आहे.

अ) प्रतिसादांच्या कृतीची योग्य मालिका तयार करण्यासाठी आवश्यकता आहे.

ब) सहभागी संस्थांना त्यांची जबाबदारी वाटुन देणे.

क) सहभागी झालेल्या विविध संस्थांना व विभागांसाठी आदर्श कृती कार्यक्रम ठरविणे,

ड) उपलब्ध सोयी सवलतीची सुची,

इ) उपलब्ध सुविधांच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी कार्यपध्दती,

फ) सुसंवादीत व कार्यक्षम प्रतिसादासाठी मदत कार्य करणाऱ्या विविध संस्था व अशासकीय संस्था यामध्ये सुसंवाद साधणे,

ग) मदत व पुनर्वसन कार्याचे पर्यवेक्षण व मुल्यमापन.

## १.२ धोरणात्मक निर्णय

जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कृती योजनेचे मुख्य धोरण म्हणजे जिवीत , वित्तीय व प्रर्यावणाचे रक्षण करणे तसेच जास्तीत जास्त आपत्तीचा ओझे हलके करणे, आपदग्रस्तांना तात्काळ मदत देणे व त्यांचे पुनर्वसन करणे हे होये.

हे धोरण हाच जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कृती योजनेचा पाया आहे. अशासकीय संस्था, स्वयंसेवी संघटना, समाज तसेच महाराष्ट्र शासन यांच्या परस्पर सहकार्याने व उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करुन आपत्तीचा तिव्रता कमी करणे.

## १.४.१ संवाद व माध्यम

जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कृती योजनेत तात्काळ मतदीसाठी संवाद व माध्यमाची आवश्यकता आहे. त्यासाठी निरीक्षण करणारी, ओळखणारी आणि सुचना देणारी पध्दती अंमलात आणली आहे.

## १.४.२ पर्यवेक्षण निदान व सुचना देणारी पध्दती

निरीक्षण करणारी, ओळखणारी व सुचना देणारी पध्दती.

| अ.क्र. | आपत्ती | निरिक्षण / पर्यवेक्षण केंद्रे | निरिक्षण / पर्यवेक्षण उपकरणे | सुचना पध्दती व तंत्रज्ञान | जबाबदार विभाग संस्था |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | भुकंप- | - | - | - | जिल्हाधिकारी कार्यालय. |
| २ | पुर | होय | दुरध्वणी | रेडिओ किंवा मनुष्य | जिल्हाधिकारी कार्यालय. |
| ३ | वादळ | -- | -- | -- | जिल्हाधिकारी कार्यालय. |
| ४ | साथीचे रोग | जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी | दुरध्वणी | मनुष्य | जिल्हा शल्य चिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी |
| ५ | आद्योगीक व रासायनिक अपघात | -- | दुरध्वणी | भोंगा /ध्वनी | महाव्यवस्थापनक जिल्हा उद्योग केंद्र हिंगोली. |
| ६ | आग | -- | दुरध्वणी | भोंगा / ध्वनी | नगर पालिका |
| ७ | रस्ते अपघात | -- | वायरलेस व दुरध्वणी, मनुष्य | -- | पोलीस |

# प्रकरण – २

## विविध विभागांतर्गत करावयाची पुर्वतयारी

प्रशासकीय पुर्वतयारी, उपाय योजना या व्यतिरीक्त खाली नमुद केल्याप्रमाणे जिल्हा नियंत्रण कक्षात जिल्हास्तरीय विभाग व इतर विभागाकडून पुर्वतर्यारीचे अहवाल मिळतील. विविध विभागांची क्षमता व पुर्वतयारी यांचे मुल्यमापन करण्यासाटी तसेच तात्काळ कृती केंद्र व मदत, शासन व विभागीय आयुक्त यांना अहवाल देण्यासाठी वरील अहवालाची जिल्हाधिकारी याना मदत होईल, सदर अहवाल विभाग प्रमुखांनी भरुन व दर सहा महिन्यांनी अद्यावत करुन जिल्हाधिकारी यांना सादर केला जोतो.

### २.१ पोलीस

**तपासणी सुची**

| घेतलेल्या पुर्वतयारी योजना | शेरा |
|---|---|
| आपत्ती प्रतिसाद योजना विभागास माहित असुन आपत्ती प्रतिसाद कार्यपध्दती स्पष्टपणे ठरविण्यात आली आहे. | |
| आपत्ती प्रतिसाद योजनेची प्राथमिक माहिती व प्रशिक्षण आणि त्याची कार्यपध्दती अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या तात्काळ कृतीसाठी लागणारे विशेष कौशल्य. | |
| पुनर्विलोकन व अद्यावत केलेले –<br>पुर्व उपाय योजना व कार्यपध्दती<br>उपकरणांच्या संरक्षणासाठी द्यावयाची काळजी<br>आपत्ती नंतरच्या कार्यपध्दती | |
| स्थलांतरासाठी पुरेशी पुर्वसुचना यंत्रणा | |
| आपत्ती नियंत्रणाच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नांव (Nodal Officer) | |
| प्रतिसाद कृतासाठी आवश्यक असलेले सुचीत सुविधांचे स्त्रोत | |

अहवाल सादरकर्ता :- हुद्दा / सहि / दिनांक

## २.२ महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ

### तपासणी सुची

| घेतलेल्या पुर्वतयारी योजना | शेरा |
|---|---|
| आपत्ती प्रतिसाद योजना विभागास माहिती असुन आपत्ती प्रतिसाद कार्यपध्दती स्पष्टपणे ठरविण्यात आली आहे. | |
| आपत्ती प्रतिसाद योजनेची प्राथमिक माहिती व प्रशिक्षण आणि त्याची कार्यपध्दती. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या तात्काळ कृतीसाठी लागणारे विशेष कौशल्य. | |
| पुनर्विलोकन व अद्यावत केलेले :- <br> पुर्व उपाय योजना व कार्यपध्दती <br> उपकरणांच्या संरक्षणासाठी घ्यावयाची काळजी <br> आपत्ती नंतरच्या कार्यपध्दती | |
| आपत्ती नियंत्रणाच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नांव (Nodal Officer) | |
| प्रतिसाद कृतासाठी आवश्यक असलेले सुचीत सुविधांचे स्त्रोत | |

अहवाल सादरकर्ता :- हुद्दा / सहि / दिनांक

## २.३ आरोग्य विभाग

### तपासणी सुची

| घेतलेल्या पुर्वतयारी योजना | शेरा |
|---|---|
| आपत्ती प्रतिसाद योजना विभागास माहिती असुन आपत्ती प्रतिसाद कार्यपध्दती स्पष्टपणे ठरविण्यात आली आहे. | |
| आपत्कालीन आरोग्य व्यवस्था मार्गदर्शक वर आधारीत रुग्णालयाचा आराखडा | |
| आपत्ती प्रतिसाद योजनेची प्राथमिक माहिती व प्रशिक्षण आणि त्याची कार्यपध्दती. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या तात्काळ कृतीसाठी लागणारे विशेष कौशल्य. | |
| पुनर्विलोकन व अद्यावत केलेले :-<br>पुर्व उपाय योजना व कार्यपध्दती<br>उपकरणांच्या संरक्षणासाठी घ्यावयाची काळजी<br>आपत्ती नंतरच्या कार्यपध्दती | |
| रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना जिल्हातील संभाव्य आपत्ती , परिणाम व इतर माहिती देण्यात आलेली आहे. | |
| मोठ्या प्रमाणात जखमी किंवा मृतांसाठी रुग्णालयात जागा | |
| पुरेशा नोंदीसह तात्काळ प्रवेश पध्दती | |
| आपत्ती नियंत्रणाच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नांव (Nodal Officer) | |
| प्रतिसाद कृतासाठी आवश्यक असलेले सुचीत सुविधांचे स्त्रोत | |

अहवाल सादरकर्ता :- हुद्दा / सहि / दिनांक

## २.४ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

### तपासणी सुची

| घेतलेल्या पुर्वतयारी योजना | शेरा |
|---|---|
| आपत्ती प्रतिसाद योजना विभागास माहिती असुन आपत्ती प्रतिसाद कार्यपध्दती स्पष्टपणे ठरविण्यात आली आहे. | |
| आपत्ती प्रतिसाद योजनेची प्राथमिक माहिती व प्रशिक्षण आणि त्याची कार्यपध्दती. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या तात्काळ कृतीसाठी लागणारे विशेष कौशल्य. | |
| पुनर्विलोकन व अद्यावत केलेले :-<br>पुर्व उपाय योजना व कार्यपध्दती<br>उपकरणांच्या संरक्षणासाठी घ्यावयाची काळजी<br>आपत्ती नंतरच्या कार्यपध्दती | |
| जनतेला तात्काळ पिण्याच्या पाण्याबद्दल माहिती देणारी पुरेशी पुर्वसुचना यंत्रणा | |
| चालु पाण्याचा स्त्रोत नष्ट झाल्यास तात्काळ पाणी वाटपासाठी स्थापित कार्यपध्दती | |
| आपत्ती नियंत्रणाच्या व्यवस्थापनासाठी नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यांचे नांव | |
| प्रतिसाद कृतीसाठी आवश्यक असलेले सुचीत सुविधांचे स्त्रोत | |

अहवाल सादरकर्ता :- हुद्दा / सहि / दिनांक

## २.५ पाटबंधारे विभाग

### तपासणी सुची

| घेतलेल्या पुर्वतयारी योजना | शेरा |
|---|---|
| आपत्ती प्रतिसाद योजना विभागास माहिती असुन आपत्ती प्रतिसाद कार्यपध्दती स्पष्टपणे ठरविण्यात आली आहे. | |
| आपत्ती प्रतिसाद योजनेची प्राथमिक माहिती व प्रशिक्षण आणि त्याची कार्यपध्दती. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या तात्काळ कृतीसाठी लागणारे विशेष कौशल्य. | |
| पुनर्विलोकन व अद्यावत केलेले :-<br>पुर्व उपाय योजना व कार्यपध्दती<br>उपकरणांच्या संरक्षणासाठी घ्यावयाची काळजी<br>आपत्ती नंतरच्या कार्यपध्दती | |
| १ जुलै पासुन पुर पर्यवेक्षण यंत्रणा संभाव्य पुर क्षेत्रात कार्यरत असतील | |
| सर्व कर्मचाऱ्यांना आपआपल्या जिवीताची व वैयक्तीक मालमत्तेची काळजी घेण्याविषयी कल्पना असेल. | |
| प्रत्येक तांत्रिक सहाय्यकाला आपत्ती समयीच्या कामाकाजाबद्दल माहिती असेल | |
| टाक्यामध्ये पाणी साठून ठेवणे व पर्यवेक्षण करण्याच्या पध्दती अस्तीत्वात असलेल्या जिलहा नियंत्रण कक्षातील व दुसऱ्या धरणाच्या असलेल्या अधिकाऱ्यांना सावध करण्याच्या पध्दती | |
| विकसीत यंत्रणा :-<br>पाण्याची पातळी खाली जाण्याबद्दल आगावू सुचना देण्यासाठी ठिकाणा<br>स्थलांतर<br>दसऱ्या धरणावरील अधिकाऱ्यांबरोबर संबंध | |
| आपत्ती नियंत्रणाच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नांव (Nodal Officer) | |
| प्रतिसाद कृतासाठी आवश्यक असलेले सुचीत सुविधांचे स्त्रोत | |

अहवाल सादरकर्ता :-  हुद्दा / सहि / दिनांक

## २.६ दुरसंचार विभाग

### तपासणी सुची

| घेतलेल्या पुर्वतयारी योजना | शेरा |
|---|---|
| आपत्ती प्रतिसाद योजना विभागास माहिती असुन आपत्ती प्रतिसाद कार्यपध्दती स्पष्टपणे ठरविण्यात आली आहे. | |
| आपत्ती प्रतिसाद योजनेची प्राथमिक माहिती व प्रशिक्षण आणि त्याची कार्यपध्दती. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या तात्काळ कृतीसाठी लागणारे विशेष कौशल्य. | |
| पुनर्विलोकन व अद्यावत केलेले :- <br> पुर्व उपाय योजना व कार्यपध्दती <br> उपकरणांच्या संरक्षणासाठी घ्यावयाची काळजी <br> आपत्ती नंतरच्या कार्यपध्दती | |
| आपत्ती नियंत्रणाच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नांव (Nodal Officer) | |
| प्रतिसाद कृतासाठी आवश्यक असलेले सुचीत सुविधांचे स्त्रोत | |

अहवाल सादरकर्ता :- हुद्दा / सहि / दिनांक

## २.७ सार्वजनिक बांधकाम विभाग

### तपासणी सुची

| घेतलेल्या पुर्वतयारी योजना | शेरा |
|---|---|
| आपत्ती प्रतिसाद योजना विभागास माहिती असुन आपत्ती प्रतिसाद कार्यपध्दती स्पष्टपणे ठरविण्यात आली आहे. | |
| आपत्ती प्रतिसाद योजनेची प्राथमिक माहिती व प्रशिक्षण आणि त्याची कार्यपध्दती. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या तात्काळ कृतीसाठी लागणारे विशेष कौशल्य. | |
| पुनर्विलोकन व अद्यावत केलेले :-<br>पुर्व उपाय योजना व कार्यपध्दती<br>उपकरणांच्या संरक्षणासाठी घ्यावयाची काळजी<br>आपत्ती नंतरच्या कार्यपध्दती | |
| आपत्ती पुर्व दक्षता आपत्तीनंतरची रस्ता दुरुस्तीची कार्यपध्दती आणि आवश्यक असेल तेथे सुरक्षित स्थलांतर सर्व अधिकाऱ्यांना परिचीत आहेत. | |
| आपत्ती नियंत्रणाच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नांव (Nodal Officer) | |
| प्रतिसाद कृतासाठी आवश्यक असलेले सुचीत सुविधांचे स्त्रोत | |

अहवाल सादरकर्ता :- हुद्दा / सहि / दिनांक

## २.८ कृषि विभाग

### तपासणी सुची

| घेतलेल्या पुर्वतयारी योजना | शेरा |
|---|---|
| आपत्ती प्रतिसाद योजना विभागास माहिती असुन आपत्ती प्रतिसाद कार्यपध्दती स्पष्टपणे ठरविण्यात आली आहे. | |
| आपत्ती प्रतिसाद योजनेची प्राथमिक माहिती व प्रशिक्षण आणि त्याची कार्यपध्दती. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या तात्काळ कृतीसाठी लागणारे विशेष कौशल्य. | |
| पुनर्विलोकन व अद्यावत केलेले :- <br> पुर्व उपाय योजना व कार्यपध्दती <br> उपकरणांच्या संरक्षणासाठी घ्यावयाची काळजी <br> आपत्ती नंतरच्या कार्यपध्दती | |
| आपत्तीत पिकांचे सभाव्य नुकसान तसेच ते टाळण्यासाठीचे मार्ग याबाबत माहिती | |
| विभागाच्या स्त्रोत्रातल्या अशासकीय संघटना व मदत संस्थांना माहिती दिली आहे. | |
| आपत्ती नियंत्रणाच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नांव (Nodal Officer) | |
| प्रतिसाद कृतासाठी आवश्यक असलेले सुचीत सुविधांचे स्त्रोत | |

अहवाल सादरकर्ता :- हुद्दा / सहि / दिनांक

## २.९ पशु संवर्धन विभाग

### तपासणी सुची

| **घेतलेल्या पुर्वतयारी योजना** | **शेरा** |
|---|---|
| आपत्ती प्रतिसाद योजना विभागास माहिती असुन आपत्ती प्रतिसाद कार्यपध्दती स्पष्टपणे ठरविण्यात आली आहे. | |
| आपत्ती प्रतिसाद योजनेची प्राथमिक माहिती व प्रशिक्षण आणि त्याची कार्यपध्दती. अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर सोपविलेल्या तात्काळ कृतीसाठी लागणारे विशेष कौशल्य. | |
| पुनर्विलोकन व अद्यावत केलेले :-<br>पुर्व उपाय योजना व कार्यपध्दती<br>उपकरणांच्या संरक्षणासाठी घ्यावयाची काळजी<br>आपत्ती नंतरच्या कार्यपध्दती | |
| रुग्णालयाच्या कोणत्या खोल्या / इमारती हानी प्रतिरोधक आहेत, याबाबत कर्मचारी परिचीत आहेत. | |
| संभाव्य आपत्ती, नुकसान व परिणाम आणि जिवित व मालमत्तेच सरक्षण करण्याविषयीची माहिती पशुवैद्यकीय आत्याने केंद्राच्या क्रमचाऱ्यांना पुरविली आहे. | |
| मोठ्या प्रमाणात पशुधन आल्यास त्यासाठी रुग्णालायची जागा. | |
| पुरेशी नोंदीसह तात्काळ प्रवेश पध्दती. | |
| आपत्ती नियंत्रणाच्या व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे नांव (Nodal Officer) | |
| प्रतिसाद कृतासाठी आवश्यक असलेले सुचीत सुविधांचे स्त्रोत | |

अहवाल सादरकर्ता :- हुद्दा / सहि / दिनांक

# प्रकरण – ३

## जिल्हा स्तरावरील संस्थात्मक संरचना

जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन समिती ही सर्वोच्च असेल व आपत्ती व्यवस्थापनात महत्वाची भुमिका पार पाडील. जिल्हा स्तरीवरील प्रतिसाद योजना ही जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली असुन ते जिल्हा आपत्ती व्यवस्थापक म्हणून काम करतील.

### ३.१ जिल्हाधिकारी कार्यालयाचे जबाबदारी

जिल्हाधिकारी कार्यालय हे कर्तव्य खालील प्रमाणे

१) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीच्या सहाय्याने जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कृति योजनेची निर्मिती करणे.
२) जिल्हा नियंत्रण कक्षाची उभारणी करणे.
३) परस्पर सहकार्य व जबाबदार गटाची स्थापना करण्यास उत्तेजन देणे.
४) जिल्हा आपत्कालीन कृती योजनेतंर्गत जिल्हा स्तरावरील विविध विभाग हे सुचिना मिळाल्या पासुन तर मदत आणि पुनर्वसन होई पर्यंतच्या कार्यासाठी आपल्या विभागाचे क्षेत्रीय जाळे तयार करतील.
५) आपत्तीस्थळी आपत्ती नियंत्रणाखाली विविध कार्य पार पाडतील.
६) जिल्हाधिकारी स्थळ कृतिकेंद्र मदत करेल स्थळ कृति केंद्राचा प्रमुख स्थळ व्यवस्थापक असेल ते विविध आपदग्रस्त भाग शिबीरक्षेत्र यांच्यातील समन्वयक म्हणून काम पाहतील तसेच जिल्हा नियंत्रण कक्षाला अहवाल देण्याचे कामही स्थळ कृति केंद्र करेल.
७) सर्व क्षेत्रीय प्रतिसादांचा समन्वय राखण्याचे काम जिल्हाधिकारी कार्यालय करेल. क्षेत्रीय प्रतिसादात तात्पुरती शिबीरे, मदत केंद्रे व गुराढोरांचे शिबीरांचे समावेश होईल.

जिल्हा नियंत्रण कक्षात कार्याची विभागणी केलेली असेल. प्रत्येक कक्षासाठी स्वतंत्र कक्ष अधिकारी असुन माहिती गोळा करण्याची अभिलेख ठेवण्याची व ती जिल्हा आपत्ती व्यवस्थापकांना विशिष्ट कार्यासाठी देण्याची त्यांची जबाबदारी असेल.

- आकृती १ -

## जिल्हा स्तरावरील समन्वय रचना

जिल्हाधिकारी
(जिल्हा आपत्ती व्यवस्थापन)

↓

जिल्हा नियंत्रण कक्ष
(कक्ष अधिकारी व प्रभारी अधिकारी)

↓

१) पोलीस विभाग
२) जिल्हा नागरी रुग्णालय
३) सार्वजनिक बांधकाम विभाग
४) महाराष्ट्र जिवन प्राधिकरण
५) महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ
६) परिवहन महामंडळ
७) गट विकास अधिकारी

↓

स्थळ कृती केंद्र / केंद्र स्थळ व्यवस्थापक /नियंत्रक

↓

- तात्पुरती शिबीरे- शिबीर अधिकारी
- खाद्य शिबीरे- शिबीर अधिकारी
- मदत शिबीरे- शिबीर अधिकारी
- गुरांसाठी शिबीरे- शिबीर अधिकारी

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती:

समितीची आपत्ती व्यवस्थापन बाबत वर्षातून किमान एकदा मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होईल.

### समितीचे मुख्य कामे-

१) पूर्वतयारी
२) क्षमताबांधणी
३) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कृती योजनेत वेळोवेळी सुधारणा

| पदनांम | समिती मधील पद |
|---|---|
| मा. जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| मा.अध्यक्ष जि.प.हिंगोली. | सह अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| जिल्हा पोलीस अधिक्षक | सदस्य |
| अपर जिल्हाधिकारी | सदस्य |
| निवासी उपजिल्हाधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जिल्हा शल्यचिकित्सक | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग | सदस्य |

## ३.३ जिल्हा नियंत्रण कक्ष

जिल्हा नियंत्रण कक्ष वर्षभर व दिवसभर चालु असेल
कर्मचारी - १ अव्वल कारकुन १, लिपीक - १, शिपाई - १

**कर्तव्ये**

१) पुर, अतिवृष्टी, जास्त झाडे उन्मळुन पडणे, रस्ते अपघात, औद्योगीक व रासायनिक अपघात, वादळ, भुकंप, आग, साथीचे रोग, याबाबतची माहिती जिल्हयाच्या विविध भागातुन मिळविणे व ती मा. जिल्हाधिकारी , निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व सर्व तहसीलदार यांना देणे.
२) जुन ते ऑक्टोंबर या कालावधीत पाटबंधारे विभाग, जिल्हयातील सर्व धरणावर बारीक लक्ष ठेवून असेल.

मा. जिल्हाधिकारी यांचे नियंत्रणाखाली जिल्हा नियंत्रण कक्ष हे पर्यवेक्षण / निरीक्षण, समन्वय, आपत्ती व्यवस्थापनाची अंमलबजावणी यांचे मुख्या केंद्र असेल.

### ३.३.१ नेहमीचा कृती कार्यक्रम

**जिल्हा** आपत्कालीन व्यवस्थापनाची नेहमीच्या काळातील जबाबदारी म्हणजे :-

१. सर्व सुचना देणारी साधने, संवाद साधणारी साधने सुस्थीतीत आहेत याची खात्री नियमीत करणे.
२. जिल्ह्यातील स्त्रव विभागांकडून संभाव्य धोक्याबाबतची माहिती गाववार व तालुकावार ठराविक काळानंतर मिळविणे.
३. जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापकांना सर्व विभागाकडून पुर्वतयारी विषयीचे अहवाल मिळतील व ते तात्काळ, मदत व कृति केंद्र व विभागीय आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात येतील.
४. जिल्ह्यामध्ये होणाऱ्या बदलाची दखल घेऊन जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन योजनेचे अद्यावतीकरण करणे.
५. टेबल क्र. १ प्रमाणे सर्व सुविधांच्या यादीचे तसेच इतर माहितीचे अद्यावतीकरण करणे.
६. यशदा व तात्काळ मदत कृती केंद्र यांना माहितीचे अद्यावतीकरण व जिल्ह्यात होणारे बदल याविषयी कळविणे.

७. पुर्वतयारीच्या उपाययोजना, प्रशिक्षण कार्यक्रम या विषयी विविध विभागांनी घेतलेल्या कार्यक्रमावर पर्यवेक्षण कळविणे.

८. जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कृती योजनेविषयी जिल्हा स्थानिक व संभाव्य आपत्ती स्थळी माहिती मिळेल अशी व्यवस्था करणे.

९. परस्पर सरकार्य व प्रतिसाद गटाची स्थापना होण्यास मदत करणे.

१०. आपत्तीनंतरचे मुल्यमापन करणे व त्यानुसार जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन कृती योजनेचे अद्यावतीकरण करणे.

११. जिल्हास्तरीय आपत्तीविषयी अहवाल तयार करुन तो तात्काळ कृती केंद्रास सादर करणे त्यामध्ये

अ) आपत्तीची स्त्रोत व कारण,

ब) प्रतिसाद प्रयत्नांनी माहिती.

क) प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी शिफारसी.

## ३.३.२ आपत्ती किंवा आपत्तीची पुर्व सुचना

आपत्तीची पुर्व सुचना मिळाल्यानंतर किंवा आपत्ती संपल्या नंतर तात्काळ कृती केंद्राकडून आपत्ती विषयी पुर्वसुचना मिळाल्यानंतर मा. जिल्हाधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापकाचे अधिकार वापरतील. जिल्हा प्रशासन हे पुर्वसुचना तसेच सावधतेची सुचना देणारे महत्वाचे संघटन आहे. याशिवाय खालील संस्थांना पुर्वसुचना किंवा सावधतेची सुचना देण्याचे अधिकार असतील.

| आपत्ती | संबधीत यंत्रणा |
|---|---|
| अ) भुकंप | भारतीय हवामान शास्त्र विभाग<br>महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था |
| ब) पुर | भारतीय हवामान शास्त्र विभाग पाटबंधारे विभाग |
| क) वादळ | भारतीय हवामान शास्त्र विभाग |
| ड) रस्ते अपघात | पोलीस |
| इ) औद्योकीक व रासायनीक अपघात | जिल्हा उद्योग केंद्र व महाराष्ट्र राज्य औ. वसाहत व पोलीस विभाग |
| ग) आग | अग्नीशमन केंद्र , पोलीस |

-भुकंप झाल्याबाबतची किंवा त्या संबंधीची पुर्वसुचना पुढील घटकांना दिली जाईल.

१) मुख्य सचिव, मदत आयुक्त, तात्काळ कृती केंद्र
२) विभागीय आयुक्तांचे कार्यालय.
३) जिल्हाधिकारी सर्व अधिकारी, नगरपालीका, परस्पर मदत व प्रतिसाद गट
४) केंद्र सरकारचे जिल्हास्तरावरील अधिकारी,
५) पालकमंत्री, महापौर, नगराध्यक्ष, जि.प.अध्यक्ष, खासदार व जिल्ह्याच्या आपत्ती प्रभाग क्षेत्रातील आमदार,
६) संरक्षण विभागाचे स्थानिक विभाग.

-आपत्ती संबंधी पुर्वसुचना मिळ्याल्यानंतर सर्व संदर्भातील आपत्ती नंतरच्या खालील उपाययोजना हाती घेतल्या जातील.

१) मा. जिल्हाधिकारी जिल्हा नियंत्रण कक्षाचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापक म्हणून काम पहातील.

२) विशिष्ट कामाची जबाबदारी घेण्यासाठी जिल्हा नियंत्रण कक्षाचा विस्तार केला जाईल.

३) जिल्हास्तरावरील सर्व विभागाचे कर्मचारी जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतील.

यामध्ये जिल्हास्तरावरील खालील विभागाचाही समावेश होईल.

अ) जिल्हा परिषद, न.पा अधिकारी,

ब) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण

क) सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण.

ड) पाटबंधारे, जिल्हा उद्योग केंद्र ,

इ) दुरसंचार विभाग.

४) वरील सर्व विभागात कार्यरत असणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या रजा आपोआप रद्द होतील व वरील विभाग आपल्या कर्मचाऱ्यांना कामावर हजर होण्याबाबत आदेश देतील आणि त्यंाची सेवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापकांनी (जिल्हाधिकारी) आरक्षीत केल्यासंबंधीची माहिती त्यांना देतील.

५) नैसर्गीक आपत्ती २२४५ या लेखाशिर्षाखाली मिळणाऱ्या आगाऊ रक्कम किंवा कर्ज यावर मदत आयुक्तांचे नियंत्रण आहे. त्यामुळे या लेखाशिर्षाखाली मिळणारे अनुदान मा. जिल्हाधिकारी यांचेकडे असेल व मदत आणि पुनर्वसन यात कोणतीही बाधा येणार नाही हे पहावयाचे काम मदत आयुक्त यांचे आहे.

६) मोठ्या प्रमाणावरील आपत्तीच्या वेळी जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन स्थानिक संरक्षण दलाच्या संपर्कात राहून आपत्तीतुन सुटका करण्यासाठी स्थलांतर व तात्काळ मदतीसाठी त्यांची मदत घेऊ शकतील.

७) जिल्हा आपत्ती व्यवस्थापकांना खाजगी क्षेत्राचे स्त्रोत, हत्यारे उपयोगी साहित्य आरक्षित करण्याचे अधिकार असतील.

८) जिल्हा आपत्ती व्यवस्थापक औद्योगीक क्षेत्रात त्यांची आपत्कालीन व्यवस्थापन योजना कार्यान्वीत करण्यासंबंधी तसेच परस्पर मदत व प्रतिसाद गटाकडून मदत घेण्याबाबत दिशा देण्याचे अधिकार असतील.

९) जिल्हा आपत्ती व्यवस्थापक स्थळ कृती केंद्राची आपत्तीग्रस्त भागात कक्षनिहाय स्थापना करतील.

१०) जिल्हा आपत्ती व्यवस्थापक मदत शिबीरे, खाद्य शिबीरे व पशुंसाठी शिबीरांची स्थापना करण्यास परवानगी देतील.

११) जिल्हा नियंत्रण कक्षापासुन स्थळ कृती केंद्र, तात्पुरती शिबीरे, मदत केंद्रे व पशुंसाठीच्या शिबीरांपर्यंत बिनतारी संदेश यंत्रणेद्वारा संवाद साधण्यासाठी व पोहोचण्यासाठी सुविधा पुरविण्यास उत्तेजन दिले जाईल.

१२) जिल्हा आपत्ती व्यवस्थापक, आपत्ती व त्यावर केलेल्या उपाययोजना संबधी प्राथमिक अहवाल मुख्य सचिव, मदत आयुक, तात्काळ कृती केंद्र व विभागीय आयुक्त यांना पाठवतील.

१३) शेजारच्या जिल्ह्यात, शेजारील जिल्हा दुसऱ्या राज्यात असेल तरी व तिथे याच प्रकारची आपत्ती होण्याची शक्यता असेल तर जिल्हा आपत्ती व्यवस्थापक त्यांना सावधानतेची सुचना करतील.

१४) जिल्हा आपत्ती व्यवस्थापक तात्काळ स्थलांतरासाठी गरज पडेल तेव्हा परवानगी देतील.

१५) अनेकविध जिल्हा आपत्ती साठी अतिरिक्त मदत आयुक्तांची नेमणुक केलेली असेल तर जिल्हाधिकारी (जिल्हा आपत्ती व्यवस्थापक) आपला अहवाल त्यांना सादर करतील.

-जिल्हाधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत अपर जिल्हाधिकारी/ निवासी उपजिल्हाधिकारी/ सहाय्यक जिल्हाधिकारी हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापकांचे सर्व अधिकार वापरतील व जबाबदाऱ्या पार पाडतील.

### ३.३.३ जिल्हा नियंत्रण कक्षाची रचना

जिल्हा नियंत्रण कक्षात जिल्हाआपत्ती व्यवस्थापकांचे खालीलप्रमाणे कार्य असतील.

१) सर्वाधिक महत्वाच्या बाबी ठरविणे.

२) खालील सेवाबाबत समन्वय व मार्गदर्शन करणे.

   a. संरक्षण सेवा, राज्य राखीव दल, केंद्रीय राखीव पोलीस दल, गृहरक्षक दल किनारा संरक्षक दल, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल.
   b. अग्निशमन सेवा, सामाजिक सुरक्षा.
   c. दुरसंचार विभाग, रेल्वे, पोर्ट ट्रस्ट, भारतीय अन्न महामंडळ.
   d. दुरदर्शन, आकाशवाणी, म.रा.वि.वि. म., महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य परिवहन (ST) महामंडळ सार्वजनिक बांधकाम विभाग.
   e. हवामान शास्त्र विभाग, म.अ.सं.सं., महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
   f. राज्य सरकारचे विमाने व हेलिकॅप्टर्स.

३) अशासकीय व मदत करणाऱ्या संस्ता यांच्यात बरोबर समन्वय राखणे., केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या अखत्यारीतील प्रयोगशाळा व संस्ता यांचा विशिष्ट सेवेसाठी उपयोग करुन घेणे.

### ३.३.४ कृती कक्ष

कृती कक्षाचे नियंत्रण निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिक्षक मुख्याल हिंगोली यांचे अधिपत्याखाली असेल.

**अ) कार्ये :-**

खालील कार्यासाठी कृती प्रतीसाद :-

१) सुटका व स्थलांतर.
२) गंभीररीत्या जखमी झालेल्यांना तात्काल हलवणे.
३) शिजलेले अन्न व पाणी यांचा तात्काळ पुरवठा
४) धोक्याच्या ठिकाणाहन मालमत्ता वाचवणे.
५) प्रेताची विल्हेवाट लावणे.
६) निर्जन धोक्याच्या ठिकाणी असलेल्या व्यक्तींना तात्पुरत्या शिबीरापर्यंत घेऊन येणे व अशा व्यक्तींसाठी प्रथमोचार, औषधे, पाणी यांची ताबडतोब सोय करणे.
७) तात्पुरत्या शिबीरांची तात्काळ उभारणी करणे.

**ब) जिल्हास्तरीय उपलब्ध असलेले साहित्य विकत, भाड्याने किंवा आरक्षित करण्याची कार्यवाही करणे.**

**क) खालील ठिकाणी संबाद साधण्याची व्यवस्था करणे.**

१) तात्काळ कृती केंद्र.
२) विभागीय आयुक्तांचे कार्यालय.
३) पोलीस, रेल्वे, अग्नीशमन सेवा, संरक्षण सेवा, भारतीय अन्न महामंडळ, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, केंद्रीय समाजिक कार्य विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, पाटंबधारे विभाग, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, उपप्रादेशिक परिवहन विभाग, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र हवामान शास्त्र विभाग व जिल्ह्यातील विविध विभागांतर्गत मदत कार्याचा समन्वय ठेवणे.
४) परस्पर मदत व प्रतिसाद गट.
५) अशासकीय संस्था व त्यांच्यात समन्वय साधणारी समिती.
६) दानशुर व्यक्ती.

**ड) अहवाल देणे.**

१) अपत्तीबाबत प्राथमिक माहितीची व त्यावरील उपयाोजननेचा अहवाल तात्काळ कृती केंद्र व विभागीय आयुक्तांना पाठवणे.

२) विभागीय आयुक्त व तात्काळ कृती केंद्र यांनी मागविलेली इतर कोमतीही माहिती देणे.

३) तात्काळ कृती केंद्र व विभागीय आयुक्त यांना कर्मचारी विभागणी व स्त्रोतांची विभागणी यांची माहिती देणे.

४) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांच्या मार्गदर्शनाखाली कोणत्या बाबींचा पाठपुरावा करावयाचा  ते पहाणे.

**इ) जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन व मदत कार्याचे निरिक्षण व प्रयवेक्षण करणे.**

**फ) बाजारात मध्यस्थी करणे.**

१) स्थानिक बाजार पेठेस लवकच उत्तेजना     मिळण्यासाठी आर्थिक घडामोडीस प्राधांन्य देणे.

**२)** मदत कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांचा साठा, किंमत चढवणे, व भ्रष्टाचार आणि विना परवाना विक्री यावर बंदी घालणे व यामध्ये गुंतलेल्या कायदेशीर कारवाई करणे.

**ग) सर्वसाधारण कर्तव्ये**

१) जिवीतहानी, जखमी व गुरेढोरे मृत्यु पावणे, पिकांचे व घरांचे नुकसान याबाद्दल मिळणाऱ्या मदतीसाठी व भरपाईसाठी आवश्यक कार्यालयीन कायदेशीर बाबींबाबत प्रसार करणे.

२) मदत कार्यासाठी नेमलेल्या जिल्ह्यातील सर्व कर्मचाऱ्यांची माहिती ठेवणे. (उदा. नियुक्तीची वेळ, सेवेचा कालावधी, रजा कालावधी जास्त वेळ केलेले काम.)

३) विभागीय मुख्यालय, तसेच राज्य सरकार यांच्याकडून मिळणाऱ्या सुचना, आदेश याबाबत माहिती घेणे, व त्यांची अंमलबजावणी आपत्तीस्थळी होते की नाही हे पहाणे.

४) राहाण्यासाठी जागा, घरे, वाहने, हत्यारे यांचे मदत कार्यासाठी आरक्षण करणे.

५) मदत कार्य करणाऱ्या सर्व वाहनांना प्रवेशपत्र व ओळपत्र व ओळखीचे बिल्ले देणे.

६) मदत कार्य करणाऱ्या सर्व व्यक्तींना प्रवेशपत्र व ओळपत्र देणे.

**७)** परतफेड करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने खर्च मंजुर करणे.

### ३.३.५ सेवा कक्ष

(जिल्हाधिकारी हिंगोली, मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. हिंगोली)

**अ) मदत कार्य**

१) माहिती  नुसार शोध व सुटका कार्य.
२) आवश्यकेतनुसार मदतकार्य

**ब) संघटन व समन्वय**

१) मदत शिबीरांची स्थापना
२) अन्नधान्य व कुटंुबाना अन्न शिजवण्यासाठी आवश्यक साहित्याचा पुरवठा
३) गुरांठोरांसाठी शिबीरे
४) स्थळ कृती केंद्र मदत शिबीरे, व तात्पुरती शिबीरे यांना मदत
५) गुराढोेरांना खाद्य पुरवठा
६) स्थल कृती केंद्रांना बि-बियाणे, कृषि साहित्य व सेवा यांचा पुरवठा
७) कल्याणकारी सेवा.
८) कायदा व सुव्यवस्था राखणे (चोरी, लुट रोखणे)

**क) अशासकीय संघटनामध्ये समन्वय**

१) जिल्हास्तरीय अशासकीय संघटना व राज्यस्तरीय अशासकीय संघटना म्हणजेच रेडक्रॉस, लॉयन्स क्लब , I.M.A., N.I.M.A., जायंटस क्लब यांच्यात समन्वय प्रस्थापीत करणारी यंत्रणा उभारणे.
२) कृती दल समिती यावर सेवा करण्यासाठी अशासकीय संघटनांची निवड करणे.
३) विशिष्ठ कार्यासाठी त्या त प्राविण्य असलेल्या अशासकीय संघटनेनांना ते नमुन देणे  व तसा अहवाल तात्काळ कृती केंद्रास देणे.
४) शासकीय व अशासकीय यंत्रणाकडुन मिळालेल्या व वाटप केलेल्या मदतीचा अहवाल देणे.
५) लोकसहभाग व स्वयंसेवक यांच्या कार्यात समन्वय साधणे.

**३.३.६ पायाभुत सुविधा कक्ष**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, हिंगोली, शिक्षणाधिकारी जि.प. , कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. हिंगोली, बांधकाम जिल्हा परिषद हिंगोली.

**अ) मातीचा, दगडांचा ढीग उचलण्यासाठी/ स्वच्छ करण्यासाठी संघटन व समन्वय करणे.**

**ब) नादरुस्त, नुकसान झालेल्या सुविधांची तात्परती दरुस्ती करणे.**

१) विज, पाणी, वाहतुक
२) दुरसंचार
३) रस्ते, पुल, कालवे
४) सार्वजनिक इमारती

**क) सोई सुविधांची रचना करणे**

१) सांडपाण्याची व करमणूकीची व्यवस्था असणाऱ्या निवासांची निर्मीती.
२) हातपंप व विंधन विहीरींची निर्मीती.
३) तात्पुरते साठवणूक केंद्र
४) शैक्षणिक सुविधा,
५) आरोग्य विषयक सुविधा, पोष्टाची सुविधा
६) हेलीपॅडची सुविधा.

### ३.३.७ आरोग्य कक्ष

जिल्हा आरोग्य अधिकारी हिंगोली, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा जि.प., उपसंचालक पशुसंवर्धन हिंगोली, मुख्याधिकारी न.प. हिंगोली जिल्हा शल्यचिकित्सक हिंगोली.

**अ) संघटन करणे व खालील विषयावर माहिती ठेवणे.**

१) आजारी व जखमी लोकांना दिलेले उपचार
२) साथीचे रोग विरोधी कृती व प्रतिबंधक औषधी.
३) प्रेतांची विल्हेवाट
४) मृत जनावरांची विल्हेवाट
५) अन्न पाणीपुरवठा, सांडपाणी यांच्या विल्हेवाटावर अहवाल.

**ब) पुरवठा व पर्यवेक्षण**

१) जखमी व्यक्तींसाठी आरोग्य सुविधा
२) जखमींना पाठवण्यासाठी ॲम्बुलन्स व दवाखाने
३) औषधे व वैद्यकीय हत्यारे
४) साथीचे रोग प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक ती माहिती व उपचार.

क) गुणवत्ता टिकविण्यासाठी पर्यवेक्षण

१) टँकरद्वारे व इतर सुविधाद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी पिण्याच्या पाण्याचे स्रोत शोधणे.
२) स्वयंपाक व अन्न शिजविण्यासाठी पाणी पुरवठा, सांडपाण्याची विल्हेवाट, आरोग्य सुविधा व तात्पुरते मदत शिबीर यावर पर्यवेक्षण करणे.
३) गुरांच्या शिबीरात खाद्य, पाणी पुरवठा, मलनिस्सारण पशुवैद्यकीय सेवा यावर पर्यवेक्षण करणे.

### ३.३.८ तर्कशास्त्रीय कक्ष (Logistics Desk)

जिल्हा पुरवठा अधिकारी हिंगोली, उपविभागीय अधिकारी हिंगोली / वसमत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) हिंगोली.

अ) सर्वसाधारण

१) माहिती मिळाल्या नुसार जादा माणसांची कुमक किंवा स्त्रोत व इतर प्रकारची मदत पाठविणे (नमुणा दिलेला आहे.)
२) प्रेत दहनासाठी आवश्यक लाकुड, त्यांची उपलब्धता त्यांचा साठा व वाहतुक व त्या कामासाठी आवश्यक मनुष्यबळाची वाहतुक.
३) प्रेत दहनाची जागा निश्चित करणे, जास्तीच्या स्त्रोतांसाठी इतर जिल्ह्यांकडुन, विभागीय मुख्यालय व तात्काळ कृती केंद्राकडुन मदत मागविणे.
४) पेट्रोल पंपचालकाकडूुन इंधन मिळविण्यासाठी मदत वाहनांसाठी ओळखपत्र देण्याची व्यवस्था करणे.
५) आपदग्रस्त कुंटुंबाना खरे मदत तिकीट मिळणे कामी पर्यवेक्षण व समन्वय.
६) मदत साहित्याचा सुरक्षित साठा व वाहतुक करणेकामी खात्री करणे.
७) खाजगी दात्यांनी व अशासकीय सदस्यांनी दिलेल्या मदतीचा समन्वय राखणे.
८) वाहनाची योग्य देखभाल व दुरुस्ती याकडे लक्ष देणे.

ब) खालील बाबींशी वाहुतकीचा समन्वय राखणे

१) रेल्वे, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
२) खाजगी वाहतुकदार, जहाज वाहतुकदार,
३) राज्य सरकारची विमाने, हेलिकॅप्टर्स.

क) खालील बाबींसाठी वाहतुक संघटन

१) सुटका पार्टी, मदत करणाऱ्या व्यक्ती,
२) निर्जन ठिकाणी अडकलेल्या व्यक्ती,
३) स्वयंसेवक,
४) पाणी, औषधे, प्रथमोपचार व शिजवलेले अन्न
५) मदत साहित्य,
६) गंभीररित्या जखमी व आजारी.

### ३.३.९ कृषि कक्ष

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हिंगोली.

अ) संघटन व समन्वय करणे.

1) कृषिविषयक उत्पादनाचे पुनर्वसन करणे,
2) बि-बियाणे व इतर साधन सामग्रीचा पुरवठा करुन पिकांचे तात्पुरते उत्पादनात घट येणार नाही याची काळजी घेणे.
3) विस्तार विभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवा.

### ३.३.१० संवाद व माहिती व्यवस्थापन कक्ष

जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली.

अ) जिल्हा नियंत्रण कक्षात माहिती केंद्राची उभारणी करुन त्याबाबतची माहिती प्रसार माध्यमाद्वारे जनतेपर्यंत पोहोचेल याची व्यवस्था करणे.

ब) आय.एम.डी., पाटबंधारे, मेरी, यांच्या सल्ल्याने व समन्वयाने आपत्तीची पुर्वसुचना व हवामान विषयक परिस्थिती यावर पर्यवेक्षण करणे.

क) सर्वसाधारण -

1) जिल्हा आपत्ती व्यवस्थापक यांच्या तर्फे बाहेर संदेश पाठविणे.
2) आलेल्या व गेलेल्या संदेशांचे रजिस्टरमध्ये नोंद ठेवणे.
3) स्थळ कृति केंद्राकडून माहिती गोळा करुन ठेवणे.
4) विभागीय आयुक्त व तात्काळ कृती केंद्रासाठी माहिती तयार ठेवणे.
5) आपत्ती विषयी व त्यावरील उपाययोजनेविषयी सर्व माहिती संग्रहीत करुन ठेवणे.

ड) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कृती योजनेत असलेली सर्व माहिती तयार ठेवणे व त्यामध्ये

1) विभागीय आयुक्त, मुख्य सचिव, व इतर सचिव यांचे कार्यालय, निवासाचे दुरध्वणी क्र. व मोबाईल क्र. फॅक्स क्र.
2) जिल्हयातील सर्व अधिकारी, कर्मचारी व तात्काळ दुरध्वनी केंद्राचे क्र. नाव व पद, पेजर क्र. इत्यादी विषयी माहिती.
3) आपत्ती स्थळावरील लोकांची यादी, जे मदत कार्यात मदत करु शकतील.

४) दुसऱ्या नियंत्रण कक्षाचे दुरध्वणी, फॅक्स क्र. वायरलेस इ.

५) क्षेत्रीय अधिकाऱ्याचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक.

६) जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक.

७) जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापक, कृती योजनेसाठी आवश्यक ती माहिती नकाशासह.

८) नकाशावर इतर ठिकाणीही संभाव्य आपत्तीची ठिकाणे, तसेच बदली रस्ते, पाण्याचे स्त्रोत आवश्यक सेवांचा आराखडा इत्यादी दाखवावे.

**३.३.११ सुविधा कक्ष**

**निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली.**

**अ) खालील बाबींचा तपशिल ठेवणे.**

१) मिळालेल्या रोख रकमेचे चलने, दाव्यानुसार तसेच वाटप केलेल्या रकमेचा हिशोब ठेवणे.

२) मदत साहित्यासाठी साठा रजिस्टर व वाटप रजिस्टर ठेवणे.

३) सर्व व्यक्तींचे प्रवास भत्ते, रोजचे वेतन, प्रशासनावर झालेला खर्च, आपत्ती व्यस्थापनावर झालेला खर्च, इतर शासकीय विभागाकडे वर्ग केलेला गोपनिय निधी, सर्व रोख रकमेच्या व उधारीच्या पावत्या, दिलेली नुकसान भरपाई इ. बाबत हिशेब व माहिती ठेवणे.

४) तात्काळ कृती केंद्राकडे पाठवावयाची व नमुन्यात दिल्याप्रमाणे हिशेब व रोख पैसे यांची माहिती तयार करणे.

**ब) पावत्या देणे**

१) सर्व रोख रकमेसाठी

२) सर्व मिळालेल्या साहित्यासाठी.

क) सर्वसाधारण.

१) रोजचे वेतन, दावे, थकीत रक्कम व मंजुर खर्च यांचे वाटप करणे.

२) प्रशासनाने मंजुर केलेली परतफेड वाटप तसेच रोख पावत्या व वाहनाच्या इंधनाच्या उधारीच्या पावत्यांचे वाटप करणे.

**३.३.१२ जिल्हाधिकारी कार्यालयाची जबाबदारी.**

**नैसर्गिक आपत्ती घडल्यानंतर जिल्हाधिकारी हे खालील प्रमाणे कार्य करतील.**

१) विभागीय इतर जिल्ह्यातुन मदतीची जास्तीची कुमक पाठवतील.
२) मुख्य सचिव, मदत आयुक्त व तात्काळ कृती केंद्र यांच्या सतत संपर्कात राहातील.

३.४ स्थळ कृती केंद्र व मदत शिबीर

३.४.१ **नियोजन तत्वे**

-छोट्या स्वरुपाची आपत्ती नियंत्रण कक्षात विस्तृत स्वरुपाची रचना न करता तहसीलकार्यालयातुन हाताळता येईल.

-जास्त खेड्यांवर परिणाम करणारी व जास्त घरांचे नुकसान करणारी व विस्तृत भुभागावर जास्त ठिकाणी पसरलेली आपत्ती.

१) व्यवस्थापनात अडथळे निर्माण करते.
२) मदत कार्याचे विकेंद्रीकरण, जिल्हा नियंत्रण कक्षाची कार्यक्षमता वाढवील व त्यासाठी नियंत्रण कक्षाची संरचना अपघातस्थळी जरुरीची आहे.
३) स्थळ कृती केंद्र व मदत केंद्राची उभारणी मदत कार्याची कार्यक्षमता वाढवील.

### ३.४.२ स्थळ कृती केंद्र

आपत्तीचे स्वरुप व प्रकारावरुन कदाचीत जास्त मदत केंद्रे, पशु शिबीरे उभारणीची गरज पडु शकेल तेव्हा अशा परीस्थितीत जिल्हा आपत्ती व्यवस्थापक, जिल्हा नियंत्रण कक्षावर पडणार भर कमी करण्यासाठी स्थळ कृती केंद्राची उभारणी करु शकतील. जेव्हा मदत कार्य व पुनर्वसन कार्य संपेल किंवा जेव्हा मदत शिबीरे व पशु शिबीरांची गरज संपेल तेव्हा स्थळ कृती केंद्र बंद करता येतील.

स्थळ कृती केंद्राचे कार्यक्रम हे टेबल क्र. ३ मध्ये दिलेले आहेत.

उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी स्थळ कृती केंद्राचे व्यवस्थापक म्हणून काम पहातील.

यामध्ये असा संभव आहे की, या प्रकारच्या समन्वय रचनेत अनेक कृती कार्यक्रम हे जिल्हा नियंत्रण कक्षातील कृती कार्यक्रमाप्रमाणेच असतील म्हणून कोणत्याही कार्यक्रमाची पुनर्नियुक्ती होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. स्थळ कृती केंद्राचा मुख्य उद्देश म्हणजे स्थळ शिबीरे व जिल्हा नियंत्रण कक्ष यांच्यात सुसंवाद (दळणवळण) निर्माण करणे होय, टेबल क्र. २ मध्ये दिलेली रचना ही कार्यक्रम करायला पुरेशा पडेल.

### ३.४.३ मदत शिबीरे

